उत्कृष्ट क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३२६ ■ शनिवार २९ ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26

भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

# देशात अठरा शहरांना पुराचा सर्वाधिक धोका
## मुंबई पुण्यासह संवेदनशील शहरांचा समावेश

**नवी दिल्ली, दि.२८- नेपाळमध्ये महापुराने हाहाकार माजलेला असतानाच मुंबई आणि पुण्यासह देशातील शहरांना पुराचा सर्वाधिक धोका असल्याची माहिती समोर आली आहे. केंद्राच्या गृह मंत्रालयाने पूर जोखमीच्या दृष्टीने अतिसंवेदनशील असलेल्या पंधरा राज्यांतील अठरा प्रमुख शहरांची यादी तयार केली आहे. या यादीत महाराष्ट्रातील मुंबई आणि पुण्याचा समावेश आहे. गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी ही माहिती दिली.**

शहरी पूर जोखीम निवारण कार्यक्रमांतर्गत नियोजनासाठी गृहमंत्रालयाने एकूण पाच हजार ५२० कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यापैकी मुंबईसाठी सातशे सात कोटी ७१ लाख रुपये, पुण्यासाठी दोनशे ८६ कोटी ६९ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीअंतर्गत मुंबईला ५० कोटी रुपये, तर पुण्याला ७५ कोटी रुपये देण्यात आले आहेत. मात्र, दुसऱ्या टप्प्यात मंजुरी मिळालेल्या शहरांना अद्याप एकही रुपयाचा निधी देण्यात आलेला नाही, अशी माहिती राय यांनी दिली. पुराची उच्च असुरक्षितता, दाट लोकवस्ती आणि प्रमुख क्षेत्रीय घटकांचे एकत्रित मूल्यांकन करून या शहरांची निवड करण्यात आली आहे.

पुरामुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी गृह मंत्रालयाने शहरी पूर जोखीम निवारण कार्यक्रम सुरूवात केली आहे. गृहमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीने पहिल्या टप्प्यात मुंबई आणि पुण्यासह चेन्नई, कोलकाता, अहमदाबाद, हैदराबाद आणि बंगळुरू या सात महानगरांत हा कार्यक्रम राबविण्यास मंजुरी दिली आहे. दुस-या टप्प्यात भोपाळ, भुवनेश्वर, गुवाहाटी, जयपूर, कानपूर, पटणा, रायपूर, तिरुवनंतपुरम, विशाखापट्टणम, इंदूर आणि लखनौ या शहरांचा



समावेश करण्यात आला आहे.

**अनियोजित विकासामुळे जोखीम**

शहरांचा अनियोजित विकास, सिमेंटचे पक्के रस्ते आणि पाणी जिरण्यासाठी अपुरी मोकळी जागा यामुळे पूरस्थितीचा धोका वाढला आहे. त्याचबरोबर नैसर्गिक जलमार्ग आणि तलावांवर झालेले अतिक्रमण तसेच पाण्याचा निचरा होण्याचे मार्ग बंद **(पान ४ वर)**

## राज्यातील ३७ भाविक तिबेट मध्ये सुखरूप

मुंबई, दि.२८- कैलास मानसरोवर यात्रा पूर्ण करून परतीच्या प्रवासात तिबेटमधील सागा येथे अडकलेल्या महाराष्ट्रातील ३७ भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे. हे सर्व भाविक आता सुखरूप काठमांडूच्या दिशेने रवाना झाले असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या तातडीच्या पुढाकारामुळे त्यांचा परतीचा मार्ग सुकर झाला आहे. ठाणे, पुणे, अलिबाग, रायगड आणि डोंबिवली परिसरातील हे ३७ भाविक कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेले होते. यात्रा पूर्ण झाल्यानंतर परतीच्या प्रवासात ते तिबेटमधील सागा येथे अनपेक्षितपणे अडकून पडले होते. काठमांडूहून त्यांच्या परतीचे विमान २९ ऑगस्ट रोजी दुपारी दोन वाजता नियोजित आहे. त्यामुळे विमानाची वेळ चुकू नये यासाठी त्यांना **(पान ४ वर)**

# पेपरफूटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर मुंबई गुन्हे अन्वेषण
## पथकाकडून संशयित आरोपींच्या घराची झाडाझडती

**नंदुरबार, दि.२८ (प्रतिनिधी) - औषध निरीक्षक पेपर फुटी प्रकरणातील संशयित आरोपी प्रविण पाटील याला नंदुरबारला आणण्यात आले. कौटिल्य केडमीचे पाटील यांच्यासह मुख्याध्यापक अमृत पाटील, ऋतूजा पाटील,गौरव पाटील यांच्या घराची झाडा झडती घेण्यात आली.**



मुंबई पोलिस पथक प्रविण पाटील यांना घेवून नंदुरबारला सकाळी दाखल झाले.यानंतर त्यांनी सर्व कागदपत्रे,मोबाईल,लॅपटॉपची तपासणी केली,तसेच आक्षेपार्ह साहित्य जप्त. केले. पेपरफुटी प्रकरणात दलाल प्रवीण पाटील ,परीक्षार्थी ऋतूजा पाटील,तिचा प्रियकर गौरव, ऋतूजाचे वडिल तथा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक अमृत पाटील यांच्या घराची झाडा झडती घेण्यात आली. ज्ञानदिप सोसायटीत मुंबई पोलिसचे विशेष पथक दाखल झाले होते.आरोपींच्या तोंडावर काळे फडके बांधून त्यांना नंदुरबारला आणण्यात आले.मागच्या महिन्यात देखील पोलिस नंदुरबारला दाखल झाले होते. त्यावेळेस त्यांच्या हाती काही गवसले नव्हते.आजच्या झाडाझडतीमध्ये त्यांना अनेक पुरावे सापडल्याचे सांगितले जात आहे. पेपरफुटी प्रकरणात नंदुरबारचे अजून काही शिक्षक देखील असल्याचे बोलले जात आहे.त्यामुळे पेपरफुटीचे धागेदोरे तसेच या प्रकरणाचे केंद्र नंदुरबार असल्याचे सांगण्यात येत आहे. एमपीएससीचे **(पान ४ वर)**



# सोनगीर परिसरात मेंढ्या चोरणाऱ्या टोळीचा धुमाकूळ
## अहिल्यानगरमध्ये चोरांच्या दगडफेकीत दोघे जखमी

**सोनगीर दि.२८ (प्रतिनिधी)- सोनगीर व परिसरात शेळ्या-मेंढ्या चोरणाऱ्या टोळीने अक्षरशः धुमाकूळ घातला असून दर एक-दोन दिवसांनी चोरीचे प्रकार समोर येत आहेत. गुरुवार (दिनांक २७ ऑगस्ट) रोजी मध्यरात्री अहिल्यानगर परिसरात अज्ञात चोरट्यांनी मेंढ्या पळवण्याचा प्रयतक केला. मात्र, ग्रामस्थ आणि मेंढपाळांनी प्रसंगावधान दाखवत पाठलाग केल्याने चोरांनी तुफान दगडफेक केली. या हल्लूयात दोन आदिवासी बांधव गंभीर जखमी झाले असून इतर दोघे मुकामार लागून दुखापतग्रस्त झाले आहेत. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री १:३० ते २:३० वाजेच्या सुमारास चोरट्यांच्या टोळीने अहिल्यानगर येथील भिमा गोरख ठेलारी यांच्या मेंढ्यांच्या वाड्याचे तारेचे कुंपण कापून मेंढ्या चोरण्याचा प्रयतक केला. भिमा ठेलारी यांच्या पतकीला जाग आल्याने त्यांनी आरडाओरड केली आणि आजूबाजूचे मेंढपाळ जागे झाले. पकडले जाण्याच्या भीती पोटी चोरांनी तीन मेंढ्या घेऊन तिथून पळ काढला. यानंतर त्यांनी तिथून १ किलोमीटर अंतरावर असलेल्या हॉटेल सुवर्णगिरीच्या मागच्या बाजूला सुभान देवमण भिल या आदिवासी बांधवाच्या बकऱ्या चोरण्याचा प्रयतक या टोळीने केला. तेथेही सुभान भिल यांना जाग आल्याने त्यांनी व त्यांचा पुतण्या सुरेश भगवान भिल यांनी चोरांना घेराव घालण्याचा प्रयतक केला. एका बाजूने ठेलारी (मेंढपाळ) बांधव आणि दुसऱ्या बाजूने आदिवासी बांधव अशा कचाट्यात अडकलेल्या चोरांनी अंधाराचा फायदा घेत तुफान दगडफेक सुरू केली.या तुफान दगडफेकीत सुभान देवमण भिल व सुरेश भगवान भिल हे दोघे गंभीर जखमी झाले, तर भिमा गोरख ठेलारी व रघुनाथ गोपाल ठेलारी यांना मुकामार लागला. जखमींना पहाटे तीन वाजता ग्रामीण रुग्णालय सोनगीर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. ग्रामस्थांच्या प्रतिकारामुळे चोरट्यांनी चोरलेल्या ३ मेंढ्या शेतातच सोडून अंधारात पळ काढला.

घटनेची माहिती मिळताच शुक्रवारी सकाळी सहाय्यक पोलीस निरीक्षक तुषार देवरे यांनी प्रभारी सरपंच लखन ठेलारी आणि भारतीय जनता **(पान ४ वर)**

### शालार्थ आयडी घोटाळा प्रकरण
# माळीच येथे कुटुंबियांना मारहाण
## तेहतीस जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**धुळे, दि.२८- शिक्षकांच्या मान्यता आदेश व शालार्थ आयडीवरील कथित बनावट स्वाक्षऱ्यांबाबत वरिष्ठ कार्यालयात तक्रार केल्याने पगार रोखण्यात आला. यावरून संतप्त झालेल्या काहींनी माळीच (ता. शिंदखेडा) येथील कुटुंबीयांना घरात घुसून मारहाण केली. मारहाणीनंतर संशयित घटनास्थळावरून पसार झाले. याप्रकरणी नरडाणा पोलीस ठाण्यात तेहतीस जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला.**

महेंद्र पुंडलिक देसले (४०, रा. माळीच, ता. शिंदखेडा, जि. धुळे) यांनी नरडाणा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार बुधवारी ( २६ ऑगस्ट) सकाळी दहाच्या सुमारास माळीच येथील काही जणांसह संशयितांनी त्यांच्या घरात प्रवेश केला. शिक्षक मान्यता आदेश व शालार्थ आयडीवरील कथित बनावट स्वाक्षऱ्यांबाबत वरिष्ठ कार्यालयात तक्रार करण्यात आली होती. याचा राग मनात ठेवून संशयितांनी महेंद्र देसले यांच्या घरातील कागदपत्रांची पाहणी केली. देसले व त्यांच्या कुटुंबीयांना शिवीगाळ, दमदाटी, मारहाण केली. गावातील काही जण आल्याने वाद अधिक वाढला, यावेळी पोलिस येत असल्याचे **(पान ४ वर)**

# दोंडाईचात आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने तणाव; संशयिताच्या घरावर दगडफेक

**दोंडाईचा दि. २८ (प्रतिनिधी)- शिंदखेडा तालुक्यातील दोंडाईचा शहरातील गरीब नवाज कॉलनी परिसर दुपारी साडेतीन ते चार वाजेच्या सुमारास अचानक तापला. प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्याविषयी सोशल मीडियावर आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप करत जमावाने एका संशयिताच्या घरावर हल्ला केला आणि तुफान दगडफेक केली. या घटनेमुळे गरीब नवाज कॉलनी परिसरात मोठा तणाव निर्माण झाला होता.**

मिळालेल्या माहितीनुसार, गरीब नवाज कॉलनीतील रहिवासी हासीम निसार काकर या व्यक्तीने पैगंबर मोहम्मद यांच्याविषयी आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप करत जमाव आक्रमक झाला. याप्रकरणी काकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी मुस्लिम समाजबांधव मोठ्या संख्येने एकत्र आले.

घटनेची माहिती मिळताच दोंडाईचा पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती चिघळू नये म्हणून पोलीस संशयित काकर याला घरातून ताब्यात घेत असताना, जमावाकडून पोलिसांवर आणि काकर यांच्या घरावर दगडफेक करण्यात आली. या दरम्यान जमावाकडून वाहनांची (मोटारसायकलची) **(पान ४ वर)**

# कुस्ती हा माती-संस्कृतीचा खेळ : भदाणे
## वेल्हाणेत आमदार केसरी कुस्त्यांचा थरार

**धुळे, दि.२८- मातीतील खेळ असलेली कुस्ती ही महाराष्ट्राची संस्कृती आहे, तरुणांनी मोबाईलच्या आहारी न जाता मैदानाकडे वळावे आणि शारीरिक तंदुरुस्तीसोबतच व्यसनमुक्तीचा संदेश जपावा, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष मनोहर भदाणे यांनी केले.**

धुळे तालुक्यातील वेल्हाणे येथे श्री चांग सुलतान यात्रोत्सवानिमित्त तसेच धुळे ग्रामीणचे आमदार राघवेंद्र उर्फ राम भदाणे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य आमदार केसरी कुस्ती स्पर्धा व मानाची कुस्ती दंगल मोठ्या दिमाखात पार पडली, त्यावेळी पारितोषिक वितरण सोहळ्यात माजी अध्यक्ष मनोहर भदाणे मार्गदर्शन करीत होते.

यावेळी पंचायत समितीचे माजी उपसभापती विद्याधर पाटील, आयोजक तथा लोकनियुक्त सरपंच राजू दादा पहेलवान, माजी उपसरपंच दिनेश गायकवाड, विसरणेचे सरपंच रवींद्र पाटील, ग्रामपंचायत सदस्य दर्शील राजपूत, जयवंत शिंदे, माजी सरपंच सुपडू पाटील, विकास सोसायटीचे संचालक नाना लुकडू, शरद शिंदे, छोटू दादा, प्रताप शिंदे, माजी सदस्य रामचंद्र नाना, जयदीप पवार, माजी उपसरपंच ज्ञानेश्वर पाटील **(पान ४ वर)**

# नेर गावात घरफोडी दोन लाख लंपास

धुळे, दि.२८- नेर (ता. धुळे) येथील आरोग्य सेविकेच्या घरातून चोरट्यांनी तब्बल पावणे दोन लाखांचा ऐवज लंपास केला. काल सकाळी उघडकीस आलेल्या घरफोडी प्रकरणी रात्री उशिरा धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.आरोग्य सेविका ललीता श्रीराम कोलटके (वय ५१) यांचे नेर येथील पांडव नगरमध्ये घर आहे. बुधवारी रात्री ड्युटीला गेल्यामुळे त्यांचे घर बंद होते. घर बंद असल्याची संधी साधत चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. गुरुवारी (ता.२७) घरफोडीचा प्रकार उघडकीस आला. चोरट्यांनी ५० हजारांची रोकड, तीन तोळ्याच्या साठ हजार रुपयांच्या सोन्याच्या बांगड्या, सोन्याची मंगलपोत, कानातील दागिने, **(पान ४ वर)**

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,45,400 रु.+3% GST
सोने- 24 K -1,58,000 रु.+3% GST
चांदी- 2,44,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## क्रीडा संकूलात आज टेबल टेनिस स्पर्धा

धुळे, दि.२८- धुळे जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन आणि रोटरी क्लब ऑफ धुळे क्रॉस रोड यांच्या संयुक्त विद्यमाने नॉर्थ महाराष्ट्र फिनिक्स कप रिजनल टेबल टेनिस चॅम्पियनशिपचे आयोजन दि.२९ व ३० ऑगस्ट रोजी जिल्हा क्रीडा संकुल, गोंदूर रोड, देवपूर, धुळे येथे करण्यात आले आहे.या स्पर्धेत अहिल्यानगर, नाशिक, धुळे, जळगाव आणि नंदुरबार जिल्ह्यांमधून २८० हून अधिक खेळाडू सहभागी होणार आहेत. स्पर्धेचा प्रारंभ दोन्ही दिवशी दुपारी १२ वाजता होणार असून, स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन सायंकाळी ५ वाजता होणार आहे.महाराष्ट्र टेबल टेनिस संघटनेचे सचिव श्री. यतीन टिपणी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेत ११, १३, १५, १७ व १९ वर्षांखालील तसेच खुल्या गटातील खेळाडू सहभागी होणार आहेत. विविध गटांतील विजयी व उपविजयी खेळाडूंना रोख पारितोषिक, सन्मानचिन्हे आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. याची माहिती रोटरी क्लब ऑफ धुळे क्रॉस रोडचे अध्यक्ष हेरम दाते, सचिव सागर थोरात, असिस्टंट गव्हर्नर दीपक अहिरे आणि प्रोजेक्ट चेअरमन राकेश जैन यांनी दिली. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी इमेश सोती, स्वयंम रावल, चैतन्य जगताप यांच्यासह आयोजन समितीचे सदस्य विशेष परिश्रम घेत आहेत.

# गावठी कट्टा बाळगणाऱ्या चौघांना एलसीबी पथकाने ठोकल्या बेड्या



**धुळे, दि.२८- धुळे शहरातील संशयितानी गावठी कट्ट्या सोबत काढलेल्या फोटोवरून स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी तपासाला वेग देत गुन्ह्याचा उलगडा केला. चार जणांच्या टोळी निष्पन्न केली असून त्यात एका विधी संघर्ष ग्रस्त बालकाचाही समावेश आहे.**

नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक धुळे यांनी अवैध शस्त्रांचा शोध घेवुन कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांना गोपनीय माहिती मिळाली. जुने धुळे येथील एका साक्षीदाराचे हातात गावठी कट्टा असलेला फोटो असल्याची माहिती मिळाली.

धुळ्यातूनच कट्टा खरेदी

संभाव्य गुन्हा रोखण्याकरिता निरीक्षक वारे यांनी पथक रवाना केले. पथकाने धुळे शहरातील डी मार्टजवळ उभा असलेल्या साक्षीदारास गावठी कट्ट्यासोबत असलेल्या फोटो बाबत चौकशी केली. त्याने नागाई कॉलनीतील त्याचा मित्र विधी संघर्षग्रस्त बालक, कुंतेश प्रवीण बागुल (वय २०, रा. राजेशिव कॉलनी, धुळे) हे त्याचे घरी आल्यावर त्याने हौस म्हणुन गावठी कट्ट्यासोबत फोटो काढल्याचे सांगीतले. काही वेळातच तेथे साक्षीदाराचा मित्र विधी संघर्षग्रस्त बालक आला, त्याची चौकशी केली असता त्याने गावठी कट्टा सागर संजय जोंधळे (वय २८, **(पान २ वर)**






# आपला महाराष्ट्र

## शाळा आणि शिक्षक शिक्षणासाठी की उत्सवांसाठी?

शालेय विद्यार्थ्यांना देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राण अर्पण करणाऱ्या योद्धांचा इतिहास कळावा, वैज्ञानिक, साहित्यकार, कलावंत, राजे रजवाडे आणि विविध राज्यकर्त्यांचा इतिहास कळावा म्हणून अभ्यासक्रमातच या बाबींचा उल्लेख असतो. शिक्षक विद्यार्थ्यांना या विषयांचे शिक्षण देतात. त्यासोबत काही सणवारांची देखील माहिती विद्यार्थ्यांना शाळेतून मिळत असते. राष्ट्रीय सण शाळा महाविद्यालयात साजरे केले जातात. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांचे प्रबोधन होते. शालेय अभ्यासक्रमासोबतच या सर्व विषयांवर शिक्षकांना काम करावे लागते. परंतु गेल्या काही वर्षांपासून शिक्षकांच्या वाट्याला अनेक कामे आली आहेत. त्यामुळे ते विद्यार्थ्यांना फारसे वेळ देऊ शकत नाहीत. सध्या एस,आयआर ची जंत्री सुरू आहे त्यात जवळपास ९९ टक्के शिक्षक अडकले असल्यामुळे गेल्या दीड महिन्यांपासून अभ्यासक्रमाला सुट्टी देण्यात आली आहे. वेळ नसेल तर ते काय शिकवणार असा प्रश्न आहे. अजून महिनाभर हे काम चालणार. या व्यतिरिक्त ए आय चे प्रशिक्षण, दिव्यांगांच्या संदर्भातील प्रशिक्षण, एक पेड माँ के नाम अशा उपक्रमा अंतर्गत वृक्ष लागवड करणे आणि त्यांची जोपासना करणे. शिक्षणाधिकाऱ्यांच्या विविध बैठकांना उपस्थित राहणे आणि अहवाल सादर करणे. मध्यान्ह भोजनाची जबाबदारी घेणे, आनंदी शनिवार सारखे काही नवे उपक्रम हाती घेऊन त्याचे आयोजन करणे, चाय पर चर्चा, परीक्षा पर चर्चा असे उपक्रम राबविणे. दरमहा जयंती आणि पुण्यतिथी साजरी करणे, याशिवाय, जनगणना, मतदान प्रक्रिया, त्यासंबंधीची प्रशिक्षणे, जनावरांची मोजणी, कुत्र्यांची मोजणी, अशीही कामे शिक्षकांना लावण्यात आलेली आहेत. आता त्यात भर पडली आहे गणेशोत्सवाची. कारण हा उत्सव राज्य सरकारने राज्योत्सव म्हणून जाहीर केलेला आहे. कदाचित तो वर्ल्ड हेरिटेज मध्ये दाखल होईल.

हा उत्सव पूर्णपणे कर्मकांडाचा असूनही घराघरात असल्यामुळे त्याचे आयोजन आता शाळा महाविद्यालयात होईल. त्यासंबंधीचे उपक्रम होतील. तसे आदेश शासनाने दिले आहेत.राज्य घटनेतील तरतुदीनुसार आपली भूमिका धर्म निरपेक्ष असली पाहिजे परंतु अशा निर्णयांमुळे ती तशी राहत नाही.तरीही शासनाला आपला मनसुबा यशस्वीच करावयाचा असल्यास सर्वच धर्मांचे उत्सव शाळांमधून साजरे करावयास हवेत काय असा प्रश्न निर्माण होतो.या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षणाचे काय होणार असाही एक प्रश्न आहेच. शिक्षण जर असेच भरकटत जात असेल, शिक्षकांचा उपयोग शाळाबाह्य कामांसाठीच होत असेल तर येणाऱ्या पिढ्या बरबाद होतील एवढे निश्चित.म्हणून राजकारण बाजूला ठेऊन शिक्षण भरकटत जाऊ नये यासाठीचा विचार विचारवंतांनी,शिक्षण तज्ज्ञांनी, राजकीय क्षेत्रातील नेत्यांनी,करणे आवश्यक झाले आहे.शालेय शिक्षणाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना ज्ञान देणे, त्यांच्या विचारशक्तीला चालना देणे, त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे आणि त्यांना देशाच्या इतिहासाची, संस्कृतीची, साहित्याची, विज्ञानाची व समाजजीवनाची ओळख करून देणे असा आहे. हे सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची मुख्य जबाबदारी शिक्षकांची आहे राष्ट्रीय सण, विविध महत्त्वाचे दिवस, शैक्षणिक उपक्रम यांच्या माध्यमातूनही विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले जाते. त्यामुळे शिक्षकाचे काम केवळ पाठ्यपुस्तक शिकविण्यापुरते मर्यादित नसते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करण्याचे महत्त्वाचे कामही शिक्षक करीत असतात.मात्र गेल्या काही वर्षांत शिक्षकांच्या या मूळ कामालाच दुय्यम स्थान मिळत असल्याचे चित्र दिसत आहे. शिक्षकांवर दिवसेंदिवस अशैक्षणिक कामांचा भार वाढत आहे. ही परिस्थिती केवळ एका कामापुरती मर्यादित नाही. चौफेर त्यांचा वापर होत आहे.

गणेशोत्सव हा समाजजीवनातील महत्त्वाचा उत्सव असला, तरी शाळेचे मूलभूत स्वरूप आणि संविधानातील धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व यांचाही विचार करावा लागेल. शासनाने एखाद्या धार्मिक उत्सवाचा शैक्षणिक संस्थांमध्ये समावेश करायचा ठरविला, तर मग सर्व धर्मांच्या उत्सवांबाबत समान धोरण असावे का, हा प्रश्न स्वाभाविकपणे उपस्थित होतो. शाळा ही सर्व धर्मांच्या विद्यार्थ्यांची समान जागा आहे. त्यामुळे तिच्या उपक्रमांमध्ये संविधानिक मूल्यांचे भान असणे आवश्यक आहे.मात्र या प्रश्नापेक्षाही मोठा प्रश्न आहे तो शिक्षणाचा.शिक्षक विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी असतात. त्यांचा वेळ वअभ्यासक्रम पूर्ण करण्यात, विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेण्यात, वाचनाची सवय लावण्यात, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यात आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वापरला गेला पाहिजे. शिक्षकांना सतत वेगवेगळ्या शासकीय कामांत गुंतवून ठेवले, तर विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी कोण आणि कशी पार पाडेल हा ऐरणीवरचा मुद्दा आहे.

शाळेत शिक्षक उपस्थित आहेत, पण ते अध्यापनासाठी उपलब्ध नाहीत, अशी परिस्थिती निर्माण होणे ही शिक्षणव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा आहे. शाळेची इमारत, पाठ्यपुस्तके आणि परीक्षा यांपेक्षा महत्त्वाचे असते ते शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील प्रत्यक्ष शैक्षणिक नाते. तेच जर वेळेअभावी कमकुवत झाले, तर त्याची किंमत पुढील पिढ्यांना मोजावी लागेल.शिक्षकांना प्रत्येक कामासाठी जुंपणे हा प्रशासनाला सोपा मार्ग वाटू शकतो. परंतु त्याचा परिणाम दीर्घकाळात अत्यंत गंभीर होऊ शकतो. आज शिक्षकांचा वेळ अशैक्षणिक कामांसाठी घेतला जात आहे; उद्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत घट झाली, तर त्याची जबाबदारी कोणीच घेणार नाही.त्यासाठी शिक्षक किंवा शाळेवर ठपका ठेवता येणार नाही.

शिक्षण हे कोणत्याही सरकारच्या तात्कालिक कार्यक्रमांपेक्षा मोठे आणि दीर्घकालीन क्षेत्र आहे. त्यामुळे राजकीय मतभेद बाजूला ठेवून या प्रश्नाकडे गांभीर्याने बघण्याची वेळ आली आहे. शिक्षकांवर कोणती कामे सोपवावीत आणि कोणती कामे त्यांच्याकडून करून घेऊ नयेत, याची स्पष्ट मर्यादा निश्चित झाली पाहिजे. शिक्षकांचा उपयोग अध्यापनासाठीच सर्वाधिक झाला पाहिजे.कारण शिक्षकांचा वेळ वाचविणे म्हणजे केवळ शिक्षकांचा वेळ वाचविणे नव्हे; तो विद्यार्थ्यांचा भविष्यातील वेळ वाचविणे आहे. आज शिक्षकांना शिकवायला वेळ मिळाला नाही, तर उद्याची पिढी ज्ञानापासून वंचित राहील.म्हणूनच शिक्षण भरकटत चालले आहे का, शिक्षकांचा उपयोग शाळाबाह्य कामांसाठी अधिक आणि अध्यापनासाठी कमी होत आहे का, आणि या परिस्थितीत आपल्या पुढील पिढ्यांचे काय होणार या प्रश्नांवर विचारवंतांनी, शिक्षणतज्ज्ञांनी आणि राजकीय नेतृत्वाने गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे.

शिक्षक हा सरकारी यंत्रणेतील सर्व कामांसाठी उपलब्ध असलेला कर्मचारी नसून, राष्ट्राची पुढील पिढी घडविणारा महत्वाचा घटक आहे. त्याला शिकवू द्या. कारण शिक्षक शिकवेल, तरच विद्यार्थी शिकेल; आणि विद्यार्थी शिकेल, तरच देशाचे भविष्य घडेल.एक तर आधीच शैक्षणिक धोरण चुकविले.शिक्षणात वैज्ञानिक दृष्टिकोनच शिल्लक ठेवायचा नाही पुरातन परंपरा,संस्कृती,राष्ट्रवाद, कर्मकांड इत्यादी अशैक्षणिक तपशील आणायचे,ते शिक्षण देण्यासाठीची व्यवस्था राबवायची आणि पिढ्याच्या पिढ्या बरबाद करायच्या .त्यांच्यावर निरंकुश राज्य करायचे,त्यांना रेवड्या देऊन लाचार करून सोडायचे असा सगळा घातक शैक्षणिक आराखडा तयार होत असल्याचे स्पष्टपणे दिसते आहे.दुसरीकडे शिक्षणाचे झपाट्याने बाजारीकरण करण्याची प्रक्रिया सुरू आहे.शाळा महाविद्यालयाचे अस्तित्व संपुष्टात आणत कोचिंग क्लासेस ना प्रोत्साहन देणे, त्यातून थेट विविध स्पर्धा परीक्षांचे .नीटचे पेपर फोडणे,त्यातूनही पैसा कमवणे अशाप्रकारचे भयानक उद्योग सुरू आहेत.या परिस्थितीची जाणीव तरूणांना झाली.त्यांचे भवितव्यच लीलावात निघाले.त्यामुळे त्यांनी उठाव केला.एका मंत्र्यांचा राजीनामा घेतला. पण बदल काय झाला ? नागनाथ गेला सापनाथ आला.परिस्थिती जैसे थे.या सर्वच परिस्थितीतून शिक्षणाचे आणि नव्या पिढीचे काय होणार याचा विचार किती जणांनी केला?

## आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतीगृहात पाणी टंचाई विद्यार्थ्यांचा रास्ता रोको; सुविधा देण्याचे आश्वासन

**शहादा,दि.२८ (का.प्र.)- मोहिदा त.श.शिवारातील आदिवासी मुलांच्या वसतिगृहात गेल्या अनेक दिवसांपासून निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई, अस्वच्छता आणि विविध मूलभूत सुविधांच्या अभावामुळे संतप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी रात्री अचानक रस्त्यावर उतरून आंदोलन छेडले. मोहिदा चौफुली येथे विद्यार्थ्यांनी रात्री साडेनऊ ते मध्यरात्री बारा वाजेपर्यंत तब्बल तीन तास रास्ता रोको आंदोलन केले. विद्यार्थ्यांच्या आंदोलनामुळे परिसरातील वाहतूक पूर्णतः विस्कळीत झाली होती.**

आमच्या मागण्या पूर्ण करा... वसतिगृहातील पाण्याची व इतर समस्या तातडीने दूर करा अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी प्रशासनाच्या कारभाराविरोधात तीव्र रोष व्यक्त केला. मोठ्या संख्येने विद्यार्थी रस्त्यावर उतरल्याने रात्रीच्या वेळी मोहिदा चौफुली परिसरात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र विद्यार्थ्यांनी शांततेच्या मार्गाने आपल्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवत आंदोलन सुरू ठेवले. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक हेमंतकुमार पाटील हे पोलीस दलासह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थितीची माहिती उपविभागीय अधिकारी दीपक गिरासे, तहसीलदार संभाजीराव पाटील तसेच नंदुरबार येथील आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी चंद्रकांत पवार यांना दिली. त्यानंतर तहसीलदार संभाजीराव पाटील, प्रकल्प अधिकारी चंद्रकांत पवार आणि पोलीस निरीक्षक हेमंतकुमार पाटील यांनी विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.विद्यार्थ्यांनी प्रकल्प अधिकारी चंद्रकांत पवार यांच्यासमोर वसतिगृहातील गंभीर समस्यांचा पाढा वाचला. गेल्या अनेक महिन्यांपासून शुद्ध पिण्याच्या पाण्याची तसेच दैनंदिन वापराच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवत असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. लेखी तक्रारी करूनही प्रशासनाकडून या प्रश्नाकडे लक्ष दिले जात नाही.सध्या शहादा नगरपालिकेच्या माध्यमातून वसतिगृहाला पाणीपुरवठा केला जात असला तरी तो नियमित नसून वारंवार विस्कळीत होत असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे मुलांसह मुलींच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे मोठे हाल होत आहेत. वसतिगृहात अडीच लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी असूनही ती अनेकदा कोरडी राहते.वसतिगृह परिसरात स्वतंत्र बोअरवेल उपलब्ध करून देण्याची मागणी अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याचेही विद्यार्थ्यांनी सांगितले. पाण्याच्या प्रश्नासोबतच विद्यार्थ्यांनी व्यायामशाळा, ग्रंथालय आणि संगणक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या सुविधा मिळत नसल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवरही परिणाम होत असल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.वसतिगृहाच्या संपूर्ण परिसरात अस्वच्छता पसरली असून मोठमोठे गवत वाढल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. परिसराची नियमित स्वच्छता होत नसल्याने विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला असल्याचे विद्यार्थ्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. वाढलेले गवत तातडीने काढून परिसरात नियमित स्वच्छता राखावी, अशी मागणीही त्यांनी केली.विद्यार्थ्यांच्या एक ना अनेक समस्या ऐकल्यानंतर प्रकल्प अधिकारी चंद्रकांत पवार यांनी आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांकडे आठ दिवसांची मुदत मागितली. मुलींच्या वसतिगृहातील तीन एचपी क्षमतेच्या बोअरवेलमधून मुलांच्या वसतिगृहाला पाणीपुरवठा करण्यासाठी तातडीने नवीन पाइपलाइन टाकण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच मुलांच्या वसतिगृहासाठी प्रस्तावित नवीन बोअरवेल करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.शहादा नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांशी चर्चा करून वसतिगृहांना नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी प्रयतक केले जातील, असेही पवार यांनी सांगितले. विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेली व्यायामशाळा, ग्रंथालय आणि संगणक सुविधा आठवड्याभरात उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देण्यात आले. वसतिगृह परिसरातील वाढलेले गवत काढून नियमित स्वच्छता राखण्यात येईल, असेही त्यांनी विद्यार्थ्यांना आश्वस्त केले.यावेळी तहसीलदार संभाजीराव पाटील, पोलीस निरीक्षक हेमंतकुमार पाटील, डॉ. कांतीलाल टाटिया, अनिल भामरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शांतता राखण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यासाठी प्रकल्प अधिकारी चंद्रकांत पवार यांनी तातडीने पाठपुरावा करावा, अशी सूचनाही यावेळी करण्यात आली.



## अवैध धंद्यांविरोधात पो.नि.वारेंना शिवसेना महिला आघाडीचे राखी बांधून साकडे



**धुळे, दि.२८- शहरासह जिल्हाभरामध्ये अवैधंद्यांचा सुळसुळाट झाला असून दररोज कोट्यावधी रुपयांचे महामार्गालगत उतरविले जाणारे गुटक्याचे कंटेनर, नकली दारू, अमली पदार्थ, सट्टा बेटिंग यामुळे गुन्हेगारी वाढत असून सर्व तरुणाई व्यसनाधीनतेच्या आहारी जात असून अनेक कुटुंब उध्वस्त होत आहेत. तरुणाईला वाचवण्यासाठी आपल्या धुळेकर बंधूंचे आरोग्य सुदृढ व्हावे याकरता शिवसेना महिला आघाडीच्या वतीने आज रक्षाबंधनाच्या औचित्य साधून स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे व स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागातील सर्व पोलीस अधिकारी यांना रक्षाबंधन दिनानिमित्त राखी बांधून आमच्या भावांचे प्राण वाचवा असे अनोखे साकडे घालण्यात आले.**

महिला आघाडीच्या वतीने औक्षण करत राखी बांधून पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांना बहिणीची भावाला घालण्यात आलेली साद हे पत्र देखील रक्षाबंधनानिमित्त भेट दिले. या पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, शहरामध्ये गुंडगिरीने कळस घातला असून नकली ,दारू, गुटखा तस्करीमध्ये सत्ताधारी पक्षाच्या आशीर्वादाने अनेक लोक गुंतले आहेत. अशी चर्चा धुळे शहरात आहे.प्रत्येक १०० मीटर वर सट्टा पेढ्या दारूचे गुप्ते दिसून येतात. काल परवा एक कोटी रुपयांचा गुटखा नाशिकच्या एफडीए अधिकाऱ्यांनी पकडला. मागील महिन्यात अवैध दारूचे कारखाने आपण उध्वस्त केले. पण मुख्य आरोपींचा शोध घेतला जात नाही? गुटखा नेमका कोणाचा? दारू कारखान्याचे मालक कोण? सरकारी जागेत दारू कारखाना पोलीस गुन्हेगारांच्या संगनमताने सुरू होतो का? हे प्रश्न अनुत्तरीत आहेत. दारू गुटखा अमली पदार्थांमुळे मुले माणसे ऐन तारुण्यात मृत्यूला कवटाळतात, सट्टामुळे घरे बरबाद होतात, त्या महिलांवर कुटुंबाची जबाबदारी येऊन पडते! एक बहीण म्हणून या अवैध धंद्यांचे उच्चाटन करण्याचे वचन आजच्या पवित्र दिवशी आम्हा बहिणींना द्या. आपल्या कृतीच्या प्रतीक्षेत......धुळेकर भगिनी ...शिवसेना उबाठा सदरचा उपक्रम शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या महिला आघाडीच्या वतीने प्रभा परदेशी, अरुणा मोरे, जयश्री वानखेडे, संगीता जोशी, सुनिता वाघ, ज्योती चौधरी यांनी राबविला. त्यांच्या या उपक्रमाचे सर्वांनी स्वागत केले.

## हस्ती विद्यारंभ सेमी बालवाडीत वृक्षारोपण

**दोंडाईचा, दि.२८- हस्ती विद्यारंभ सेमी इंग्लिश बालवाडीमध्ये राखी पौर्णिमेच्या औचित्याने विद्यार्थ्यांच्या हस्ते शाळेच्या परिसरात विविध रोपांची लागवड करण्यात आली. भाऊ-बहिणीच्या प्रेमाचे, जिव्हाळ्याचे आणि एकमेकांच्या रक्षणाचे प्रतीक असलेल्या राखी पौर्णिमेच्या भावनेला निसर्गसंवर्धनाची जोड देत हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.**

शाळेचे चेअरमन माननीय कैलासजी जैन यांनी या उपक्रमासाठी विविध रोपे उपलब्ध करून दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या हस्ते शाळेच्या परिसरात लँटाना कॅमेरा, चाफा यांसह विविध रोपांची लागवड करण्यात आली.

वर्गशिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष रोपे लावण्यास सहकार्य करताना प्रत्येक वनस्पतीचे पर्यावरणीय, औषधी आणि सौंदर्यात्मक महत्त्व समजावून सांगितले. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ वृक्षारोपणाचा अनुभव न मिळता, आपण लावलेले रोप निसर्गासाठी का महत्त्वाचे आहे? याचीही माहिती मिळाली.

लँटाना कॅमेरा हे रंगीबेरंगी फुलांचे आकर्षक झुडूप असून त्याची फुले फुलपाखरे आणि विविध परागीभवन करणारे कीटक आकर्षित करतात. त्याची फळे पक्ष्यांना आकर्षित करतात आणि पक्ष्यांमार्फत बियांचा प्रसार होण्यास मदत होते. त्यामुळे स्थानिक जैवविविधतेला हातभार लागतो आणि रंगीबेरंगी फुलांमुळे परिसराचे सौंदर्यही वाढते.

चाफा हा सुगंधी आणि सुंदर फुलांसाठी प्रसिद्ध असलेला शोभेचा वृक्ष आहे. बागा, उद्याने आणि शाळेच्या परिसराची शोभा वाढविण्यासाठी त्याची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. राखी पौर्णिमेच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी एकमेकांप्रती प्रेम आणि संरक्षणाची भावना व्यक्त करण्यासोबतच निसर्गाच्या संरक्षणाची जबाबदारीही अनुभवली.



## योगेश्वर नागरी सह.पतपेढीची वार्षिक सभा उत्साहात संपन्न

**धुळे, दि.२८- धुळे येथील महाराष्ट्र राज्य सहकारी परिषदेच्या योगेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेची सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२६ ऑगस्ट २०२६ रोजी संस्थेच्या मुख्य कार्यालयात उत्साहात संपन्न झाली.**

प्रास्ताविक संचालक राज कुडे यांनी केले. त्यात त्यांनी म्हटले की, पतसंस्थेचे शक्तीपीठ कर्ज वसुलीसाठी आम्ही सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंद यांनी प्रयतक केलेत व त्या प्रयत्नात यशही येत आहे.त्यानंतर सभापती नितीन केले यांनी अध्यक्षीय मनोगतात त्यांनी स्पष्ट केले की, पतसंस्थेने नवीन कर्ज वाटप सुरू केले आहे. नवीन कर्ज वाटप केल्यामुळे व ठकीत कर्ज वसुलीमुळे संस्थेच्या उत्पन्नात वाढ झाली असून चालू आर्थिक वर्षात संस्थेचा ४०,७८,२७२/- रु. नफा झाला आहे. संस्थेस गेल्या पाच सहा वर्षांपासून ऑडिट वर्ग मकफ मिळत होता यावर्षी ऑडिट वर्ग ब हा मिळालेला आहे. आमच्या उर्वरित असलेल्या २ वर्षांच्या कार्यकाळात राहिलेल्या थकीत कर्जदारांनी आम्हास साथ दिल्यास व आपल्या सभासदांच्या आशीर्वादाने आम्ही संचालक मंडळ आपली संस्था अ वर्गात नक्कीच आणू. संचालक मंडळाने पतसंस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांचा त्यांनी चांगल्या केलेल्या कामकाजाबद्दल सत्कार केला. यावेळी उपसभापती दिलीप पाखले, संचालक संजय कुडे, प्रदीप अमृते, सुरेश सोनजे, रवींद्र भोकरे, प्रशांत वार्डकर, आशालता बागले, साधना जमदाडे त्याचप्रमाणे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.सूत्र संचालन संचालक संजय पाटील यांनी केले व आभार संचालक दिलीप माकडे यांनी मानले.

## आर.सी.पटेल इंग्लिश स्कूलमध्ये रक्षाबंधन

शिरपूर, दि.२८- शहरातील आदर्श नगर येथील आर.सी. पटेल इंग्लिश मीडियम प्री-प्रायमरी स्कूलमध्ये रक्षाबंधनाचा सण उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी पोशाख परिधान करून कार्यक्रमाची शोभा वाढवली.कार्यक्रमात मुलींनी मुलांच्या हातावर प्रेमाचे प्रतीक असलेल्या राख्या बांधल्या. त्याबदल्यात मुलांनी मुलींना प्रेमाची भेट देत बहीण-भावाच्या नात्याची जिव्हाळ्याची भावना व्यक्त केली.मुख्याध्यापिका मधुबाला राही यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

### शब्दकोडे क्रमांक : २४४२



**आडवे शब्द :** १.जंगलाचा राजा,सिंह ४.आरसा या शब्दासाठी इंग्रजी शब्द ६.एकापाठोपाठ एक,अखंड किंवा न थांबता ८.बंध ९.चेहरा, मुख किंवा तोंड १०.प्रभात,सूर्योदयाची वेळ १२. भोळासांब, वेडा किंवा निष्पाप १३.संघर्ष, चळवळ किंवा लढाई १५.श्रीमंत,धनवान किंवा बडा माणूस १७.थोडेसे,अल्प किंवा वृद्धत्व १९.डाळीत फोडणीसाठी वापरतात तो मसाल्यातील एक पदार्थ २१.गज २२.दुधापासून बनवला जाणारा पौष्टिक पदार्थ २३.हालअपेष्टा, गैरसोय किंवा दैना २६.खिडकीला लावायची लोखंडी सळई २७.ठाणे जिल्ह्यातील एक प्रसिद्ध नदी आणि धरण २८.भेट होणे किंवा दोरीला मारलेली ग्रंथी ३०.कारस्थान, कट रचणे ३२.पोटात होणारा एक प्रकारचा परजीवी किडा ३३.भेग किंवा तडाखा ३४.खाऱ्या पाण्यातील एक चवदार आणि प्रसिद्ध मासा ३५.हात किंवा शासनाला द्यावा लागणारा टॅक्स ३६.गळ्यातील हार ३७. ओळखण्यासाठी दिलेले अभिधान किंवा होडी ३८.रत ४०.नजर टाका, पाहा ४१.पाऊल किंवा पाय ४३.लहान,लहानगा किंवा छोटा ४५.विमानांचा शोध घेणारे अत्याधुनिक यंत्र ४७.पारंपारिक कला ५०.कालवण ५२.प्रश्न किंवा पेच ५४.रईत ५५.घोड्याच्या टापेला ठोकली जाणारी लोखंडी पट्टी ५६.दिलेली मुदत,वचन किंवा करार ५७.कुजलेला, सडलेला किंवा खराब झालेला ५८.पाठवणी करणे, रवाना करणे **उभे शब्द :** १. वर्तुळ, कडे किंवा प्रभावळ २.वस्तू, दागिना किंवा वस्तू मोजण्याचे एकक ३. सुकी करंदी,एक सुक्या मासळीचा प्रकार ४.एका मुलीचे नाव ५.आस्वाद,गोडी ६.लोखंडाची बारीक काठी किंवा गज ७.दुर्ग,किल्ला ११.हेतू,निमित्त किंवा सबब १२.खोडी काढणे १४.युद्धातील संरक्षणाचे मुख्य हत्यार,तलवार जोडीदार १६.सोपे, न कळत किंवा विनासायास १८.संधी, मोकळीक २०.धागा २४.पूर्ण नाश होणे किंवा पाताळ २५.तबल्याचा साथीदार २६.समूह,संघ किंवा टीम २७.कोकणातील पारंपारिक पीक २९.सभेत मंजूर केलेला प्रस्ताव किंवा निर्णय ३०.उणीव ३१.सणासुदीला दरवाजाला लावली जाणारी फुलांची माळ ३२.युद्ध,लढाई ३५.धनुष्य ३६.मागे हटणे, पराभव पत्करणे ३७.विषारी सर्प ३९.जेवणात रुची आणण्यासाठी वापरतात तो घटक ४१.अधिकृत परवानगी पत्र ४२.नोकर, सेवक किंवा कामगार ४६.डेंग्यू पसरवणारा कीटक,मच्छर ४८.गुणांची केलेली पारख ४९.घसट,मैत्री ५१.दुधावरील मलई ५३.जखमेतील पू ५५.रुमाली रोटीचा एक प्रकार

### शब्दकोडे क्रमांक : २४४१ चे उत्तर


| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वे | ग | | ब | दा | म | | फ | जि | ती | | पो |
| द | वा | खा | ना | | ल | ल | ना | | न | का | र |
| | र | | व | जा | बा | की | | डी | | ट | का |
| रा | | ता | ट | | र | | हो | | न | को | |
| म | न | न | | ब | ही | ण | | च | | न | ड |
| | म | | बे | हा | ल | | सा | प | ळा | | म |
| ह | न | न | | ल | | मो | ग | रा | | बो | रू |
| री | | ख | रा | | सां | ज | | क | बा | ब | |
| ह | नी | | ह | वा | | दा | सी | | त | डा | खा |
| र | | म | | स | त | त | | ता | मी | | र |
| | ची | | प | ना | मा | | ता | र | | शं | का |
| व | न | स्प | ती | | श्या | म | | पा | र | ख | |





## ठोकल्या बेड्या

**(पान १ वरुन)** रा. बडगुजर प्लॉट, पारोळा रोड, धुळे) याचेकडुन ४० हजार रुपयांत विकत घेवून त्यांचा मित्र कुंतेश बागुल याचेकडे ठेवल्याचे सांगीतले. कुंतेश बागुल यास ताब्यात घेत विचारपुस केली असता, त्याचा मित्र कल्पेश धर्मराज यादव (वय २१, रा.पवन नगर, चाळीसगावरोड, धुळे) याचेकडे कट्टा दिल्याचे सांगीतले. कल्पेश यादवने बुलेटच्या सिटखालील कप्प्यात कट्टा ठेवल्याचे आढळले. बुलेटसह एक गावठी कट्टा, चार जिवंत काडतुस पोलिसांनी हस्तगत केले. याप्रकरणी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. ४४ हजारांचा कट्टा, काडतूस, एक लाख रुपयांची बुलेट असा एक लाख ४४ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांचे मार्गदर्शनाखाली निरीक्षक वारे, सहायक निरीक्षक दीपक ढोके, उपनिरीक्षक अमरजित मोरे, हवालदार सदेसिंग चव्हाण, शिरीष भदाणे, महेंद्र सपकाळ, यांनी कारवाई केली.

### प्रकाश में आज हम दोनो




हेमा मालिनी राजेश खन्ना रिना रॉय लिनादास प्रेम नाथ जॉनी वॉकर जगदीप




# अंनिसचे डॉ.दाभोळकर स्मृतिदिनानिमित्त शहाद्यात निर्भयता व मानवतेची शपथ

**शहादा,दि.२८ (का.प्र.)- महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृति दिनानिमित्त शहादा शहरात निर्भयता व मानवतेची शपथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला शहरातील शेकडो नागरिक, विविध सामाजिक संस्था, संघटना तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर निर्धार वॉकला प्रारंभ झाला. विविध संस्था व संघटनांच्या सहभागातून काढण्यात आलेल्या या निर्भय रॅलीत परिवर्तनवादी घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव विनायक सावळे यांनी प्रास्ताविकातून डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येमागील वैचारिक भूमिका, तसेच विवेकवादी, मानवतावादी आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची समाजाला असलेली गरज याबाबत भूमिका मांडली. त्यानंतर परिवर्तनवादी गीतांच्या सादरीकरणासह निर्भय रॅलीला सुरुवात झाली. लढेंगे जितेंगे, विवेकाचा आवाज बुलंद करूया, फुले-शाहू-आंबेडकरांनी सारे दाभोळकर अशा घोषणांनी रॅलीत उत्साह निर्माण झाला.

रॅलीदरम्यान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर रॅली महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ पोहोचली. तेथे उपस्थित नागरिकांनी हिंसेचा विरोध, मानवतेचे कल्याण आणि अहिंसेचे समर्थन करण्यासाठी सामूहिक प्रतिज्ञा घेतली. तसेच आयुष्यभर मानवतावादी व विवेकवादी विचारांच्या बाजूने ठामपणे उभे राहण्याचा संकल्प करण्यात आला.या निर्भय वॉक मध्ये शहाद्याचे नगराध्यक्ष अभिजीत पाटील, उपनगराध्यक्षा सौ माधवीताई मकरंद पाटील, जिल्हाध्यक्ष डॉ. बी. डी. पटेल, माजी जिल्हाध्यक्ष डॉ. शशांक कुलकर्णी, अंनिसचे जिल्हा प्रधान सचिव मुकेश कापुरे, राज्य कार्यवाह रवींद्र पाटील, ज्येष्ठ लेखिका डॉ. अलका कुलकर्णी, राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष प्रा. आर. टी. पटेल, साने गुरुजी मंडळाचे मानक पटेल, पंचायत समितीच्या माजी सभापती वनिता पटेल, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष एन. डी. पाटील, जायंट्स ग्रुपचे कैलास भावसार, सर सय्यद शैक्षणिक संस्थेचे लियाकत अली सय्यद, लोकशाही जागर समितीचे चुनीलाल ब्राह्मणे, सलोखा समितीचे दादाभाई पिंपळे, जनार्थ आदिवासी विकास संस्थेच्या रंजना कान्हेरे, ज्येष्ठ नागरिक संघाचे शाखाध्यक्ष ड. गोविंद पाटील, उपाध्यक्ष प्रा. दत्ता वाघ, माकपचे जिल्हा सचिव कॉ. सुनील गायकवाड, फुले-आंबेडकर स्टडी सर्कलचे सुनील पाटोळे, विष्णू जोंधळे, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे सावन ठाकरे, डॉ. स्मिता जैन, इन्कलाब ग्रुपच्या भारती पवार, राज्य प्रधान सचिव विनायक सावळे, कार्यवाह रवींद्र पाटील, जिल्हा सचिव मुकेश कापुरे, शाखा कार्याध्यक्ष संतोष महाजन, प्रधान सचिव प्रवीण महिरे, श्रीकांत बाविस्कर, प्रदीप केदारे, आरिफ मणियार, हृदयेश चव्हाण, सुभाष भुजबळ यांच्यासह विविध संस्था-संघटनांचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी समाजात विवेक, विज्ञाननिष्ठा, निर्भयता आणि मानवतावादी विचार रुजविण्यासाठी केलेल्या कार्याला अभिवादन करत उपस्थितांनी त्यांचे विचार पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी शाखाध्यक्ष डॉ. मालविका कुलकर्णी यांनी आभार मानले.

**NAME CHANGE**

MY PREVIOUS NAME WAS
**MUHAMMAD SABIR MUHAMMAD UMAR**
AND MY NEW NAME IS
**MOHAMMAD SABIR MOHAMMAD UMAR**
ADD- 166, NEAR BANDE NAWAZ MASJID, MILLAT NAGAR, DHULE MH -424001

## आमोदा विद्यालयात तणाव मुक्त जीवन बाबत मार्गदर्शन

शहादा,दि.२८(प्रतिनिधी)- तालुक्यातील मंडळांनी येथील सद्गुरु विद्या प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक विद्यालय आमोदा येथे ताण तणाव मुक्त जीवन बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्रीमती सुनिता पटेल मॅडम तसेच पर्यावरण संरक्षण व संवर्धनपर व्याख्याते म्हणून ॲड.सुधाकर पाटील उपस्थित होते. या प्रसंगी विद्यालय मार्फत मुख्याध्यापक जगदिश पवार सरांनी मान्यवरांचे स्वागत केले. प्रसंगी सौ.पटेल मॅडमांनी ध्यान धारणेचे महत्त्व सांगून ध्वनिफितच्या सहाय्याने त्याची प्रत्यक्ष अनुभूती देऊन उपस्थित सर्व विद्यार्थी व शिक्षकांना स्वतः प्रति संवेदनशील होऊन स्वविकास कसा साधायचा याचा मंत्र दिला. तसेच ॲड.सुधाकर पाटील यांनी सर्पांच्या विविध प्रजातींची माहिती दिली. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक जगदिश पवार सर सह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पाटील यांनी केले तर आभार श्रीमती नगराळे यांनी मानले.

# रस्ता सुंदर अन त्यावर गटाराचं घाण पाणी... वा... रे प्रशासन!

## माजी सभागृह नेता कांतीलाल दाळवाले यांचा घणाघाती आरोप



**धुळे, दि.२८ धुळे शहराच्या वैभवात भर घालणारा आणि गणपती मंदिरापासून स्वामी समर्थ मंदिरापर्यंत जाणारा ऐतिहासिक शिवाजी रोड सध्या सिमेंट काँक्रीटचा केला जात आहे. गणपती मंदिर ते दाता सरकार दर्गा दरम्यानचा रस्ता तयार होऊन वाहतूकही सुरू झाली आहे. मात्र, हा चकचकीत रस्ता बनवताना महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि कंत्राटदाराने दाखवलेल्या निष्काळजीपणावर धुळे महापालिकेचे माजी सभागृह नेता कांतीलाल दाळवाले यांनी तीव्र शब्दांत ताशेरे ओढले असून समस्त धुळेकरांमधूनही तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.**

शहरात कोणताही नवीन रस्ता करताना रस्त्याशेजारील गटारी, चेंबर्स आणि रस्त्याखालून पाण्याचा निचरा करणारे क्रॉस-ड्रेनेज पाईप्स यांचे योग्य नियोजन करणे प्राथमिक कर्तव्य असते. मात्र, अग्रवाल विश्राम भवनजवळील परिस्थिती पाहता, येथे संबंधित विभागाच्या अभियंत्यांनी व ठेकेदाराने केवळ कामाची बिले काढण्यावरच भर दिल्याचे दिसते, असा थेट आरोप दाळवाले यांनी केला. कमलाबाई शाळा, साक्री रोड, गरुड मैदान, जुने कलेक्टर ऑफिस, जिजामाता शाळा व बर्वे स्मृती वसतिगृह या मोठ्या परिसरातील पावसाचे व सांडपाणी अग्रवाल भवनजवळील गटारीतून पांझरा नदीपात्रात जाते. एवढ्या मोठ्या भागाचे पाणी वाहून नेणाऱ्या गटारी रस्ता बनवताना मोठ्या करणे गरजेचे होते. परंतु, गटारी तशाच लहान ठेवल्याने साधे रोजचे सांडपाणीही आता रस्त्यावर वाहून येत आहे.

पुन्हा रस्ता फोडून बिलं काढण्याचा डाव?

जुले रोजी झालेल्या धुवांधार पावसाची पुनरावृत्ती झाल्यास अग्रवाल भवन आणि बर्वे स्मृती परिसर पूर्णपणे पाण्याखाली जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. रस्ता बनवतानाच मोठे पाईप आणि रुंद गटारी केल्या असत्या, तर ही अडचण उद्भवली नसती. आधी सुंदर रस्ता बनवायचा, मग पुराचे पाणी साचल्यावर पुन्हा तो फोडून नवीन पाईप टाकायचे आणि करदात्यांच्या पैशांवर डल्ला मारण्याचे चक्र चालू ठेवायचे, असाच कारभार सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

भाविकांच्या श्रद्धेशी खेळ!

याच रस्त्यावर हिंदू आणि मुस्लिम धर्मीयांची प्रमुख श्रद्धास्थाने आहेत. खान्देशची कुलस्वामिनी कानुबाई माता, दशामाता आणि श्री गणपती विसर्जन याच पांझरा नदीपात्रात होते. अशा पवित्र मार्गावर गटाराचे घाण पाणी वाहून भाविकांच्या अंगावर उडत असल्याने धार्मिक स्थळांचे पावित्र्य धोक्यात आले आहे.

तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

शिवाजी रोडचे काम अजून पूर्ण झालेले नाही. त्यामुळे स्वामी समर्थ मंदिरापर्यंतचे काम पूर्ण होण्याआधीच अग्रवाल विश्राम भवनजवळील गटारी रुंद करून रस्त्याखाली मोठे पाईप तातडीने टाकावेत. भविष्यातील मोठे नुकसान टाळण्यासाठी सुस्त प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि कंत्राटदाराने तात्काळ जागे होऊन हा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी कांतीलाल दाळवाले यांनी केली आहे.

# पटेल स्वायत्त अभि. आणि सिंबायोसिस चा संयुक्त उपक्रम

## उद्योगाभिमुख दोनशे पंचेचाळीस विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण संपन्न

**शिरपूर, दि.२८- आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय शिरपूर आणि सिंबायोसिस सेंटर फॉर कॉर्पोरेट ॲंड प्रोफेशनल लर्निंग, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दोन महिन्यांचे उद्योगाभिमुख प्रशिक्षण नुकतेच यशस्वीरित्या पूर्ण झाले.**

वर्गाधारित प्रशिक्षणासोबतच प्रात्यक्षिके, प्रयोगशाळा सत्रे आणि प्रकल्पाधारित शिक्षणावर भर देण्यात आला. हे प्रशिक्षण सिंबायोसिस स्किल भवन, पुणे आणि सिंबायोसिस दारावली कॅम्पस येथे आयोजित करण्यात आले होते, अशी माहिती महाविद्यालयाचे संचालक डॉ.जे.बी.पाटील यांनी दिली.




आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांना उद्योगाच्या बदलत्या गरजांनुसार अद्ययावत तांत्रिक व व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करता यावीत, यासाठी नियमितपणे प्रशिक्षण व कार्यशाळांचे आयोजन केले जाते. या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव, प्रकल्पाधारित शिक्षण आणि उद्योगातील कार्यपद्धतींची ओळख करून दिली जाते. यामुळे विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता, आत्मविश्वास आणि कॅम्पस प्लेसमेंटसाठीची तयारी अधिक सक्षम होते. याचाच एक भाग म्हणून नुकतेच पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय, शिरपूर आणि सिंबायोसिस सेंटर फॉर कॉर्पोरेट ॲंड प्रोफेशनल लर्निंग, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

सदर प्रशिक्षण उपक्रमात महाविद्यालयाच्या विविध अभियांत्रिकी शाखांमधील एकूण २४५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. घेतला. यामध्ये संगणक अभियांत्रिकीचे ११२, डेटा सायन्सचे १९, कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंगचे ३५, इलेक्ट्रॉनिक्स ॲंड टेलिकम्युनिकेशनचे ३०, इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीचे ३९ आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे १० विद्यार्थ्यांचा समावेश होता. या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना जावा फुल स्टॅक विकास, पायथनसह ए.डब्ल्यू.एस., व्यवसाय विश्लेषण तसेच रोबोटिक्स व स्वयंचलितीकरण या आधुनिक आणि उद्योगाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण तंत्रज्ञानांमध्ये तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून सखोल प्रशिक्षण देण्यात आले. प्रत्यक्ष प्रकल्प, प्रयोगशाळेतील प्रात्यक्षिके आणि उद्योगाभिमुख उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचा व्यावहारिक अनुभव मिळाला तसेच त्यांच्या तांत्रिक आणि व्यावसायिक कौशल्यांना चालना मिळाली.

या यशस्वी उपक्रमासाठी आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाचे व्यवस्थापन, सिंबायोसिस सेंटर फॉर कॉर्पोरेट ॲंड प्रोफेशनल लर्निंग (एससीसीपीएल), कॅपजेमिनी आणि ॲक्सेंचर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख प्रशिक्षणाची प्रभावी संधी उपलब्ध करून देण्यासाठी ट्रेनिंग ट्रेनिंग ॲंड प्लेसमेंट अधिकारी प्रा. मिल्केश जैन यांनी विशेष परिश्रम घेतले.

या स्तुत्य उपक्रमाच्या आयोजनाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष व माजी शालेय शिक्षण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, सर्व विभागप्रमुख, ट्रेनिंग ॲंड प्लेसमेंट विभाग तसेच महाविद्यालयातील शिक्षक, कर्मचारी यांनी समाधान व्यक्त केले.

# मुख्याध्यापक संघाच्या अध्यक्षपदी संजय पवार

धुळे, दि.२८- धुळे येथील एन.डी.पाटील विकास विद्यालयात जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाची जिल्हास्तरीय सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. सभेत जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.

यात धुळ्यातील अभय विद्यालयाचे प्राचार्य संजय पवार यांची अध्यक्षपदी, कलमाडी (ता. शिंदखेडा) येथील अगस्तमुनी विद्यालयाचे मुख्याध्यापक शांताराम कदम यांची उपाध्यक्षपदी तर उदय तोरवणे यांची सचिवपदी सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

मावळते अध्यक्ष आर.व्ही. पाटील यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या सभेस डी.के. पवार,प्रकाश सोनवणे,किरण जाधव,डी. एस.चौधरी,मधुकर गांगुर्डे,पी.आर. साळुंखे, विद्यासचिव जगदीश शिंदे, जयपाल देशमुख,इत्यादी उपस्थित होते. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी आर.व्ही.पाटील यांनी जिल्हाध्यक्ष पदी संजय पवार,उपाध्यक्ष शांताराम कदम,सचिव उदय तोरवणे यांच्या नावाची घोषणा केली .

यावेळी धुळे जिल्ह्यातील आर. जे.पाटील, संजीव सूर्यवंशी,डी. एन. पाटील,एम.डी.पाटील, जवाहर पवार,कैलास बाविस्कर,छाया पवार, संजीवनी गांगुर्डे, संगीता पवार, स्वाती भदाणे, पी.टी. लाडे. अजय भदाणे. भूपेंद्र निकम,एस. के.वसईकर, चेतन पाटील, डी. सी.महाले, कैलास अमृतकर, संदीप सोनवणे, शेखर बागुल, राम पाटील, किरण मासुले, बाळकृष्ण तोरवणे, चुनीलाल पाटील, एस.डी.गिरासे, निलेश देसले,सी.डी.राजपूत, नितीन राजपूत, इम्रान सर,के.पी. पाटील, सुनील ठाकरे, शमशुलहसन, पंकज सुर्यवंशी, मुर्तुझा सर बहुतांश मुख्याध्यापक उपस्थित होते.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे धुळे ता.जि.धुळे येथील स.नं.४७६/१अ ते १ ई पैकी (१) प्लॉट नं.१ चे क्षेत्र १७६ चौ.मी. यास विस्तारित सि.स.नं.८०६८ चे क्षेत्र १७६ चौ.मी. सत्ताप्रकार क असा लागलेला आहे. (२) प्लॉट नं.२ चे क्षेत्र १८४ चौ.मी. यास विस्तारित सि.स.नं.८०६७ चे क्षेत्र २१० चौ.मी. सत्ताप्रकार क असा लागलेला आहे.

| यासी चतु:सिमा | प्लॉट नं.१ चे | प्लॉट नं.२ चे |
| --- | --- | --- |
| पूर्वेस- | रस्ता, | रस्ता, |
| पश्चिमेस- | लागू स.नं.४८३, | लागू स.नं.४८३, |
| दक्षिणेस- | प्लॉट नं.२, | रस्ता, |
| उत्तरेस- | लागू स.नं.४८२, | प्लॉट नं.१. |

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक श्री केशरीचंद केवलजी राठोड रा.७/८, वीर भरत सोसायटी, ४९७/२, भवानी पेठ, टिंबर मार्केट, पुणे शहर, पुणे. ४११००२. यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ५ (पाच) दिवसांच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहिर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे, दिनांक- २८/०८/२०२६.

**ॲड.रोहित राजकुमार छाबिडया**
ब्लॉक नं.आर/२, रूम नं.१, कुमार नगर, साक्री रोड, धुळे.
**मो.नं.९९२२८२८८८३, ७४९९९९८९५५**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, सरकारी, निमसरकारी संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा धुळे, पोट तुकडी तालुका धुळे पैकी मौजे नकाणे येथील गट क्रमांक.९१/१/ब/१ भोगवटा वर्ग-१ यासी क्षेत्रफळ ० हेक्टर ८७ आर यासी आकार २ रुपये ७२ पैसे जिरायत शेत मिळकत यासी चतु:सिमा गाव नकाशा प्रमाणे-

येणे प्रमाणे चतु:सिमातील वर्णनाची मिळकत ही सौ.सिमा रामकृष्ण जोशी रा.धुळे यांचे मालकी व ताबे उपभोगातील असून त्यांनी आमचे अशिल यांच्याशी वरील मिळकतीचा कायमस्वरूपी खरेदी विक्री करण्याबाबतचा सौदा केलेला असून त्यांनी आमचे अशिल यांच्याकडून सौदे करारापोटी बयाणा म्हणून रोख रक्कम देखील स्विकारलेली आहे.

तरीही सदर वरील मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही स्वरूपाचे सौदे, करार, बक्षीस, गहाण, दान, खावटीपोटगी, लिजडिड, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, बोजे, ताबा, अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार इतर तबदिलीचे व्यवहार असतील तर सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्यावर पुराव्यानिशी मुळ कागदपत्रांसह लेखी हरकत घ्यावी. सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्बोज, र्निविवाद व हस्तांतरणीय आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीबाबत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी. सदरची नोटिस आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व दाखविलेल्या कागदपत्रावरून व सांगण्यावरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. ठिकाण- धुळे, दिनांक- २८/०८/२०२६.

**ॲड.परमेश्वर ए.चौधरी**
पत्ता- आधार कमल बंगलो, प्लॉट नं.४अ, नित्यानंद नगर, निरामय हॉस्पिटल मागे, ८० फुटी रोड, धुळे-४२४००१.
**मो.नं.९४२३२८९१००**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना, भुसंपादन कार्यालय व सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, वि.का, सोसायटया यांना या जाहीर नोटीसीने कळवण्यात येते की,

**मिळकत वर्णन-** तु.जि.धुळे पैकी जि.प.धुळे पैकी धुळे महानगरपालिका हद्दी बाहेरील मौजे फागणे हद्दीत्तील शेत जमीन गट नं.४८७ याचे एकूण क्षेत्रफळ ० हेक्टर ५१ आर त्यासी चतु:सिमा- पुर्वेस- गट नं.४८५, पच्छीमेस- सौदाणे रोड, दक्षीणेस- गट नं.४८८, उत्तरेस- गट नं.४८९ येणे प्रमाणे मिळकत यातील तदंग भुत वस्तुहक्कासह मिळकत दरोबस्त.

उपरोक्त मिळकत श्री.विलास वसंतराव चौधरी, सौ.सुरेखा विलास चौधरी, श्री.प्रमोद धोंडु चौधरी व सौ.जयश्री प्रमोद चौधरी यांचे मालकीची व कब्जेउपभोगातीली असून मिळकत निर्वेध असून ती त्यांना खरेदी देण्याचा हक्क व अधिकार असल्याबाबतचा पूर्ण भरोसा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. आमच्या अशिलांनी त्यांच्या सोबत सदर मिळकत खरेदी करण्याचा सौदा केलेला आहे. त्यानुसार लवकरच सदर मिळकतीचे खरेदीखत करणार आहे. सबब वरील मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, जसे गहाण, दान, लिन, लिज, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, जप्ती, जामीनकी, कब्जा, बाबदचा वाद, कोर्ट वाद, तोंडी लेखी करार मदार, अधिकार पत्र, मुख्त्यार पत्र, या अगर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध पोहचत असल्यास त्यांनी आपल्या हक्कासंबधीच्या हरकती प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत आवश्यक त्या साक्षांकीत दस्ताएवजानीशी आमचे पत्यावर समक्ष आणून द्यावे. मुदतीनंतर तसेच परस्पर वर्तमान पत्रात घेतल्या जाणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याप्रमाणे मुदतीनंतर कोणाचीही हरकत आल्यास सदरची हरकत आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे. धुळे, दिनांक- २८/०८/२०२६.

**ॲड.आनंद पी. ताथेड**
४०, बडगुजर प्लॉट, पारस डेकोरेटर्स धुळे-४२४००१.
**मो.नं.९८९०३३२३७३/९४२०६६१४६९**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे बाळापूर येथील धुळे म.न.पा. हददीतील ग.नं.८७/५ यातील प्लॉट नं.५ चे एकूण क्षेत्र १६१ चौ.मी. बखळ प्लॉट यासी चतु:सिमा- पूर्वेस- रस्ता ६ मी., पश्चिमेस- गट नं.८७/४, दक्षिणेस- रस्ता, उत्तरेस- प्लॉट नं.४.

येणेप्रमाणे वर्णनाच्या व चतु:सिमेच्या आतील मिळकत ही श्री संदीप नरेंद्र जैन रा.घ.नं.१९८४, ब्राम्हण गल्ली, मु.पो. वरणगांव ता.भुसावळ जि.जळगांव यांचे मालकीचे ताबे उपभोगातील आहे. सदर वरीलप्रमाणे मिळकत ही आमचे अशिल यांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला आहे. व त्यापोटी बयाणा रक्कम दिलेली आहे. लवकरच आमचे अशिल हे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना, सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास तसेच मिळकत हक्क, हिस्सा, टांच, गहाण, बक्षिस, जप्ती, बोजा, पतपेढी, जनरल मुखत्यार हक्क, मृत्युपत्र, सौदापावती, बोजा, खावटी हक्क, कोर्ट कचेरी, असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर वैयक्तिकपणे कागदपत्रासह कळवावी. मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास आमचे अशील सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस आमच्या अशिलांच्या सूचनेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली आहे.

दिनांक:- २८/०८/२०२६,
ठिकाण- धुळे.

**ॲड.प्रमोद एम.चौधरी**
११४, गोविंदा अपार्टमेंट, देवपूर, धुळे.
**मो.नं.९८६०७०६१७१**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, सरकारी, निमसरकारी संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा धुळे पोट तुकडी तालुका धुळे पैकी धुळे म.न.पा हद्दीतील मौजे देवपूर येथील सर्वे नं.४९/१ पैकी प्लॉट नं.६१ यांसी एकूण क्षेत्र ५०१.६७ चौ.मी. (५४०० चौ.फुट) यांस विस्तारीत सि.टी.सर्वे नं.१०६६८ यांसी एकूण क्षेत्र ५०४.१३ चौ.मी. धारणाधिकार 'क' बखळ प्लॉट असून यापैकी दक्षिणेकडील भागाचे क्षेत्र ६० फुट बाय ६० फुट म्हणजे ३६०० चौ.फुट ३३४.५७ चौ.मी. बखळ प्लॉट यासी चतु:सिमा मंजुर लेआउट नकाशा प्रमाणे:-

| | |
| --- | --- |
| पुर्वेस- | प्लॉट नं.६०, |
| पश्चिमेस- | प्लॉट नं.६२, |
| दक्षिणेस- | वापर व रस्ता |
| उत्तरेस- | प्लॉट नं.२६, २७ व २८ |

येणे प्रमाणे वरील वर्णनाचे बखळ प्लॉट मिळकतीचे हल्लीचे कब्जेदार व मालक श्री.शिवाजीराव बाबुराव पवार, रा.४१ ए.जी.टी.पी. कॉलनी, विदया नगरी, देवपूर धुळे यांचे मालकी व ताबे उपभोगातील असून यांनी आमचे अशिल यांचे सोबत वरील बखळ प्लॉट मिळकत कायमस्वरूपी खरेदी विक्री करण्याबाबतचा सौदा केलेला असून बयाणा रक्कम स्विकारली आहे.

सदर वरील बखळ प्लॉट मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही स्वरूपाचे सौदा, करार, बक्षीस, गहाण, लिजडिड, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, बोजे, ताबा, अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार इतर तबदिलीचे व्यवहार असतील तर सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्यावर पुराव्यानिशी मुळ कागदपत्रांसह लेखी हरकत घ्यावी.

सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती सदर बखळ प्लॉट मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर बखळ प्लॉट मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर बखळ प्लॉट मिळकतीबाबत पुढील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची नोटिस आमचे अशिलांने दिलेल्या माहिती व दाखविलेल्या कागदपत्रावरून व सांगण्यावरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:- २८/०८/२०२६.
नोटीस देणार तर्फे

**ॲड.प्रशांत व्ही.चौधरी**
नोटरी भारत सरकार
पत्ता- प्लॉट नं.७४, हुडको कॉलनी, चितोड रोड, धुळे, ता.जि.धुळे-४२४००१.
**मो.नं.९८२३६५५९७६**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत तिचे हिस्से राशीने विद्यमान मालक १) श्री.शरद श्रीपत पाटील २) श्री.देवेंद्र शरद खैरनार ३) शोभाबाई शरद पाटील, सर्व रा.जुनवणे, ता.जि.धुळे यांनी आमचे अशिलांना कायम विक्री करण्याचा सौदा केला असून सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी असून ती विक्री करण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याचा भरवसा आमच्या अशिलांना दिलेला आहे.

सदरहु मिळकतीचा खरेदीचा व्यवहार आमचे अशिलांना लवकरच पूर्ण करावयाचा आहे. सदरहु मिळकतीच्या महसुल दप्तरी सात बारा उताऱ्यावर इतर हक्कात सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शाखा बोरविहीर चे कर्ज बोजे नमूद आहेत. तरी या व्यतिरिक्त सदरहु शेत मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, दावा, आरक्षण, मृत्यूपत्र, हितसंबंध वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्य ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध आहे, असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील व मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

**परिशिष्ट :-** मौजे बोरविहीर, ता.जि.धुळे येथील शेत जमीन गट नं.११३/२ चे एकूण क्षेत्र ला.ला.२ हे. ८३ आर, आकार रू.५.०० पैसे, यामधील १) श्री.शरद श्रीपत पाटील यांचे मालकीचे लाला. क्षेत्र १ हे. ०० आर, आकार रू.१.७७ पैसे २) श्री.देवेंद्र शरद पाटील यांचे मालकीचे ला.ला. क्षेत्र ० हे. ८३ आर, आकार रू.१.४७ पैसे ३) शोभाबाई शरद पाटील यांचे मालकीचे ला ला. क्षेत्र १ हे. ०० आर, आकार रू.१.७७ पैसे, यांसी चर्तु:सिमा मंजूर गांव नकाशा प्रमाणे.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे, दिनांक:- २८/०८/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे,** नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे.
**मो.नं.९८२२८५२६५०**

**जाहीर सूचना नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, नगर भूमापन, धुळे येथील फायनल प्लॉट नं.६८ पैकी प्लॉट नं.१७ चे एकूण क्षेत्र ३०९६ चौ.फुट येणे प्रमाणे मिळकत वामन तापीराम भोई यांचे मालकीची होती व त्यांच्या मृत्यू नंतर त्यांचे वारस १) चंद्रभागाबाई वामन भोई २) भागवान वामन भोई ३) साहेबराव वामन भोई ४) सुकदेव वामन भोई ५) नामदेव वामन भोई हे दिनांक १३/१२/१९८४ यांची नावे फेरफार नोंदी अन्वये भोगवटदार म्हणून नावे लागले होते, व चंद्रभागाबाई वामन भोई यांचे नाव नभुअ, धुळे यांचे आदेशाने कमी झाले आहे, नमुद मिळकती पैकी हिस्से राशीने साहेबराव वामन भोई यांच्या हिस्सा उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ७७४ चौ.फुट म्हणजे ७१.९० चौ.मी. आमचे अशिल महेमुद अबुलाईस अन्सारी यांनी दिनांक १२/०९/१९९५ रोजी म.दुय्यम निंबधक, धुळे-१, यांचे कार्यालयात नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्रं.१९८२/१९९५ अन्वये खरेदी केलेला आहे. तेव्हा पासून सदरची मिळकत आमचे अशिल महेमुद अबुलाईस अन्सारी, रा.शिवाजी नगर, नुर मस्जिद समोर, नंदी रोड, धुळे यांचे मालकीची व ताबेउपभोगातील आहे.

परंतु नगर भूमापन, धुळे दप्तरी मालमत्ता पत्रकावर दिनांक १६/१०/२००१ रोजीची फेरफार नोंदीन्वय भगवान वामन भोई यांच्याकडून मिळकत खरेदी केल्याचे दर्शविले आहे, सदरहु बाबतीत दुरुस्ती व्हावी म्हणून आमचे अशिलांनी वेळोवेळी नगर भूमापन अधिकारी, धुळे तसेच उपसंचालक भूमी अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक यांच्याकडे अर्ज/अपिल दाखल केलेले होते व आहेत. सदरचे चुकीच्या नोंदीमुळे मालमत्ता पत्रिकेवर साहेबराव वामन भोई यांचे नाव कमी न होता, भगवान वामन भोई यांचे नाव कमी झालेले दिसत आहे. साहेबराव वामन भोई यांचा मृत्यू झाला असून, सदरहु चुकीच्या नोंदीच्या गैरफायदा घेऊन, साहेबराव वामन भोई यांचे वाली वारस त्यांचे नाव नमुद मिळकतीच्या मालमत्ता पत्रकावर लावण्याच्या बेतात असल्याचे आमच्या अशिलांना खात्रीशीररित्या कळाले आहे.

सदरहु बाबतीत कुणाची फसवणुक न व्हावी म्हणून सूचित करण्याकामी ही जाहीर सूचना नोटीस प्रसिध्द केलीली असून साहेबराव वामन भोई यांचे वाली वारसांशी नमुद मिळकतीबाबत कोणीही खरेदी-विक्री चा व्यवहार करू नये.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे, दिनांक:- २८/०८/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे,** नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे.
**मो.नं.९८२२८५२६५०**

२९ वा वार्षिक अहवाल

**लोकमान्य नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, धुळे**
DLE/(DLE)/RSR/CR/922/97-98 Dt. 7-4-97

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
(फक्त सभासदांसाठी)

लोकमान्य नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, धुळे चे भागधारकांची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.१३-९-२०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता अग्रवाल भवन, ऊस गल्ली, धुळे येथे संस्थेचे विद्यमान चेअरमन श्री.राकेश सुभाषजी अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनिमय करण्याकरिता आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व भागधारकांनी वेळेवर उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

-: सभेपुढील विषय :-

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. सन २०२५-२६ चे वार्षिक अहवाल व हिशोब पत्रके वाचून कायम करणे.
३. पोटनियमातील तरतुदीप्रमाणे संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
४. सन २०२५-२६ च्या अंदाज पत्रकानुसार कमी जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२६-२७ वर्षाकरिता तयार केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
५. सन २०२५-२६ चे शासकीय लेखापरीक्षण अहवाल वाचून कायम करणे.
६. सन २०२६-२७ या वर्षाकरिता अंतर्गत हिशोब तपासणीसाची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
७. सन २०२६-२७ या वर्षाकरिता संस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करून घेणेसाठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे.
८. आयत्या वेळेच्या विषयावर व मुदतीत आलेल्या अर्जावर महाशय अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा करणे.

दिनांक : २९-८-२०२६, स्थळ : धुळे

**श्री.गिरिष प्रभुदयाल अग्रवाल**
**(मा.का.संचालक)**
**(संचालक मंडळाच्या आदेशानुसार)**

-: विशेष सूचना :-

१. ज्या सभासदांना सभेकरिता विषय सुचवायचे असतील त्यांनी आपले विषय पाच दिवस अगोदर पतसंस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी कळविले पाहिजे. नंतर आलेल्या विषयांचा विचार केला जाणार नाही.
२. कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व त्या सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही.

टीप:- कृपया सभासदांनी आपले अहवाल पतसंस्थेच्या कार्यालयीन वेळेनुसार पतसंस्थेच्या कार्यालयातून घेवून जावे.

## पान १ वरुन

### शहरांना पुराचा सर्वाधिक धोका

झाल्याने अनेक शहरांमध्ये पूरसंवेदनशीलता वाढली आहे.

**रस्ते मोकळे करण्याचा प्रयत्न**

भोतेकोशी नदीला आलेल्या अचानक पुरामुळे नदीकाठच्या वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. पुरामुळे अनेक मार्गांवर माती आणि ढिगारा साचला आहे. सशस्त्र पोलिस दलाचे जवान आणि स्थानिक नागरिक रस्ते मोकळे करण्याच्या कामात सहभागी झाले आहेत. ढिगारा हटवून वाहतूक पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

**तीस देशांचे नागरिक बेपत्ता**

नेपाळच्या पर्यटन मंडळाच्या माहितीनुसार, तीसपेक्षा अधिक देशांतील पर्यटक बेपत्ता आहेत. त्यात अमेरिकेचे ६५, मलेशियाचे ५१, युक्रेनचे ३५, ऑस्ट्रेलियाचे ३५, ब्रिटनचे ३३, कॅनडाचे ९, दक्षिण कोरियाचे ९, सिंगापूरचे ८, जर्मनीचे ८, रशियाचे ८, दक्षिण आफ्रिकेचे ६, लॅटव्हियाचे ६, जपानचे ५, न्यूझीलंडचे ४, फ्रान्सचे ३, बेल्जियमचे ३, स्पेनचे ३ नागरिकांचा समावेश आहे. याशिवाय इटली, कझाकस्तान, पोर्तुगाल, आयर्लंड व नेदरलँड्समधील प्रत्येकी दोन जण बेपत्ता आहेत. बेलारूस, फिनलंड, हंगेरी, इस्रायल, लिथुआनिया, फिलिपिन्स, बल्गेरिया, स्वित्झर्लंड, सर्बिया आणि स्वीडन या देशांतील प्रत्येकी एक नागरिक बेपत्ता असल्याचे पर्यटन मंडळाने सांगितले. बेपत्ता ५३ युक्रेनियन नागरिकांपैकी ४६ पर्यटक असून नेपाळी अधिकाऱ्यांचा त्यांच्याशी संपर्क तुटला आहे.

### ३७ भाविक तिबेट मध्ये सुखरूप

निर्धारित वेळेत काठमांडू गाठणे आवश्यक होते. महाराष्ट्रातील भाविक सागा येथे अडकल्याची माहिती मिळताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने हालचाली सुरू केल्या. त्यांनी भारत सरकारच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाशी संपर्क साधून भाविकांना आवश्यक ते सहकार्य मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला. केंद्र व राज्य सरकारच्या समन्वयातून प्रशासकीय पातळीवर वेगाने हालचाली करण्यात आल्या. त्यानंतर आज सकाळी सहा वाजता सर्व ३७ भाविकांनी सागा येथून न्यालम चेक पोस्टमार्गे काठमांडूच्या दिशेने सुरक्षित परतीचा प्रवास सुरू केला.

परदेशातील दुर्गम भागात अनपेक्षितपणे अडकून पडल्यामुळे भाविक आणि त्यांच्या कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, संकटाच्या काळात राज्य सरकार आणि केंद्र सरकारकडून तातडीने मदत मिळाल्याने भाविकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. परतीचा प्रवास वेळेत सुरू झाल्याबद्दल या भाविकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र सरकार तसेच परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे विशेष आभार मानले आहेत. भाविक सुखरूप काठमांडूच्या दिशेने रवाना झाल्याने त्यांच्या नातेवाईकांनाही मोठा दिलासा मिळाला आहे.

### संशयित आरोपींच्या घराची झाडाझडती

अध्यक्ष,सचिव यांना दोषी ठरवत त्यांना बडतर्फ करा,अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे मेहमूद शेख यांनी केली आहे. प्रश्नपत्रिका नेमकी कशा पद्धतीने बाहेर आली, तिची माहिती कोणाकोणापर्यंत पोहोचली आणि या संपूर्ण प्रकरणात नंदुरबारमधील संबंधितांची भूमिका काय होती, याचा तपास मुंबई गुन्हे शाखेकडून सुरू आहे.

दरम्यान, पोलिसांच्या या कारवाईमुळे एम पी एस सी पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे नंदुरबारपर्यंत पोहोचल्याचे स्पष्ट झाले असून, मुंबई गुन्हे शाखेच्या पुढील तपासाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. झाडाझडतीदरम्यान पोलिसांच्या हाती नेमके कोणते साहित्य अथवा कागदपत्रे लागली, याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. कोटिल्य ॲकेडमीच्या माध्यमातून क्लासेस चालवले जात असत.त्यातून हमखास विद्यार्थी उत्तीर्ण होत असत. प्रविण पाटील यांच्या क्लासेसचा वर्धापन दिन साजरा केला जायचा.त्यात मोठा वक्ता बोलावला जात असे.काही दिवसापूर्वीच प्रविण पाटील याने छत्रपती शिवाजी महाराज नाट्य गृहात प्रेरणादायी भाषण देणाऱ्या वक्त्यांना बोलावले होते.त्यात एक बडा पोलिस अधिकारी,जि.प.चा अधिकारी तसेच शहरातील प्रतिष्ठीत दानशुरांना आमंत्रित केले होते. रोटरी क्लबमध्ये सदस्यत्व स्विकारले होते.

कौटिल्य ॲकेदमीत एका भाडयाच्या हॉलमध्ये चालवली जाते.ही ॲकेदमी एकप्रकारे अभ्यासिका स्थळ असल्याचे काही जाणकारांचे म्हणणे आहे. यंदाच पेपर फुटला की ही पेपरफुटीची बनवाबनवी पुर्वीपासून सुरु होती,हे पाहणे औत्सूक्याचे ठरणार आहे.

आमदार रोहित पवारांनी या प्रकरणाचा पर्दाफाश केला. आदर्श शिक्षक पुरस्कार विजेता मुख्याध्यापक अमृत पाटील यांची मुलगी ऋतूजा पाटील हिचे गौरव पाटीलशी प्रेम संबंध होते.तिने व्हाटसपच्या माध्यमातून ही बाब त्याला सांगितली. ऋतूजा ही उत्तीर्ण झाल्याने तिला अधिकारी म्हणून नोकरी लागणार होती. गौरव याच्याशी लग्न.अशक्य होते.त्यामुळे बदलेच्या भावनेतून गौरव याने आयोगाकडे तक्रार केली होती.मात्र त्याने नंतर सारवासारव करीत ही तक्रार मागे घेतली.परंतू गांगुर्डे हा नापास झालेल्या उमेदवाराने तक्रार आयोगाकडे तक्रार केली. त्याला प्रशासनाकडून त्रास देण्यात आला. मात्र तो अन्यायाविरोधात शेवट पर्यंत लढला.अर्थात त्याच्या लढाईला यश मिळाले. आयोग देखील या पेपर फुटीला सहमती दर्शवत नव्हती.मात्र पेपर फुटी असल्याचे पोलिस तपासात समोर आल्याने आयोग तोंडघशी पडली आहे.

नंदुरबार जिल्हा अशा घोटाळयामुळे राज्यभर गाजत आहे.यामुळे शहरातील लोकांमध्ये तीव्र संतापाची लाट पसरली असून ज्ञानदीप सोसायटीत राहणाऱ्या रहिवाशांनाही या प्रकरणाची लाज वाटत आहे. नंदुरबारमधील अनेक जण या प्रकरणात अडकण्याची शक्यता असून अजून एका शिक्षकाचे नाव पुढे येत असल्याने त्याच्या विरोधात तक्रार दाखल झाली आहे. त्यामुळे पेपर फुटी प्रकरणात नंदुरबारमध्ये पाच ते सहा जणांचा समावेश असल्याचे आता पर्यंत पोलिस तपासात पुढे आले आहे.हा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### संशयिताच्या घरावर दगडफेक

तोडफोडही करण्यात आली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केला.जमावाकडून झालेल्या या अचानक दगडफेकीत एक पोलीस अधिकारी आणि दोन कर्मचारी असे एकूण तीन जण जखमी झाले आहेत. जखमी पोलिसांची नावे अशी पोलीस उपनिरीक्षक राजन दुसाने, पो. कॉ. हर्षद बागुल, पो. कॉ. हिरालाल सूर्यवंशी या जखमी पोलीस कर्मचाऱ्यांना तात्काळ उपचारासाठी दोंडाईचा येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.दोंडाईचा पोलिसांनी वेळीच योग्य हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली आहे. संशयित आरोपी हासीम निसार काकर याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, घटनेचा पुढील तपास दोंडाईचा पोलीस करत आहेत. शहरात शांतता राखण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### तेहतीस जणांविरुद्ध गुन्हा दाखल

समजताच संशयित पसार झाले. याप्रकरणी फिर्याद महेंद्र देसले यांनी दिली, त्यानुसार हंसराज सुकलाल पाटील, राऊसाहेब छगन जाधव (दोन्ही रा. कलमाडी ता. शिंदखेडा, मुकेश विश्वास पाटील (रा. कंदे ता. नंदुरबार), अमोल विश्वास बेहरे, योगेश सुधाकर पाटील, देवदत्त सुरेश पिंगळे (सर्व रा. नंदुरबार), संतोष भिमराव देसले, दक्षता लोटन देसले, सुभाष भिमराव देसले, सरला संतोष देसले, प्रतिमा सुभाष देसले, नयन संतोष देसले, राहुल सुभाष देसले (सर्व रा. माळीच), किशोर लोटन पाटील (रा. धुळे), राहुल संजय खैरनार (रा. विटाई ता. शिंदखेडा), प्रशांत गोकुळ पाटील (रा. कापडणे ता. धुळे), जयपाल संजय गिरासे (रा. धांदरणे ता. शिंदखेडा), भटू कांबळे (रा. मांडळ, ता. अमळनेर जि. जळगाव), नितीन भिला पाटील (रा. होळ ता. शिंदखेडा), उमेश पाटील, तुषार पाटील, नारायण सुरेश पाटील (रा. डाबली, ता. शिंदखेडा), प्राजक्ता नामदेव पाटील, सुरेश सिसोदे (रा. नरडाणा), ज्ञानेश्वर आधार पाटील, विजय कोकणी, मंगल कोकणी, नरेंद्र नामदेव शिंदे, सोनाली मगन पवार, कविता अंबादास भदाणे (सर्व रा. खांडबारा ता. नवापूर, जि. नंदुरबार), गणेश सुभाष कापडी, भावना अरविंद पाटील, विशाखा बच्छाव (सर्व रा. नंदुरबार) या तेहतीस जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला. सहाय्यक निरीक्षक कापडणीस पोलीस उपनिरीक्षक रवींद्र महाले तपास करीत आहेत.

# शिंदखेडा ता.बारमाही सिंचनाखाली आणण्यासाठी प्रयत्न- पालकमंत्री ना.जयकुमार रावलांचे प्रतिपादन

**धुळे, दि.२८- दुष्काळग्रस्त शिंदखेडा तालुक्याची ओळख बदलून येथील जास्तीत जास्त क्षेत्र बारमाही सिंचनाखाली आणण्यासाठी सातत्याने प्रयतक सुरू आहेत. तापी नदीचे पाणी जामफळ प्रकल्पात आणि तेथून पाईप वितरण प्रणालीच्या माध्यमातून महाळपूर परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचविण्याचे नियोजन आहे. ही योजना पूर्ण झाल्यानंतर परिसरातील शेती बागायती होण्यास मोठी चालना मिळून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याबरोबरच युवकांच्या भविष्यासाठीही नव्या संधी निर्माण होतील, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.**



शिंदखेडा तालुक्यातील महाळपूर येथे विविध विकासकामांच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, सरपंच अलकाबाई निकम, उपसरपंच जितेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य संजीवनी शिसोदे, राजेंद्र देसले यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, तलाठी, मंडळ अधिकारी, शिक्षक, विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, शिंदखेडा तालुक्याच्या दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी सिंचनाच्या पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करण्यावर भर देण्यात येत आहे. सारंगखेडा, सुलवाडे, प्रकाशा, सुलवाडे-जामफळ, अमरावदी, वाडी, बुराई बारमाही प्रकल्प तसेच विहिरींच्या माध्यमातून अधिकाधिकक्षेत्राला सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. केवळ पाणीसाठे निर्माण करणे पुरेसे नसून उपलब्ध पाणी प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या शेतापर्यंत पोहोचणे आवश्यकआहे. यासाठी तापी नदीचे पाणी जामफळ प्रकल्पात आणि तेथून महाळपूर व परिसरातील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचविण्यासाठी पाईप वितरण प्रणाली योजना मंजूर करण्यात आली आहे. योजनेचे काम वेगाने सुरू असून पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. लिंकिंग पाईपलाईनचे काम पूर्ण झाल्यानंतर पहिल्या टप्प्यात परिसरातील काही हजार एकर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पीडीएनच्या माध्यमातून पारंपरिक खुल्या कालव्यांऐवजी बंद पाईपलाईनच्या जाळ्यातून नियोजनबद्ध पद्धतीने सिंचनाचे पाणी लाभक्षेत्रातील शेतांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. पुढील टप्पे क्रमाक्रमाने पूर्ण करून गावागावांत आवश्यक पाणीवाटप व्यवस्था निर्माण करण्यात येईल. ही योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर महाळपूर व परिसरातील पाणीटंचाई आणि दुष्काळाच्या समस्येवर मात करण्यास मदत होईल. पावसावर अवलंबून असलेली शेती सिंचनाखाली येऊन बागायती क्षेत्र वाढेल. त्यातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्याबरोबरच शेतीपूरक व्यवसाय, प्रक्रिया उद्योग आणि स्थानिक रोजगारालाही चालना मिळेल, असे पालकमंत्री श्री. रावल म्हणाले.

## पान १ वरुन

### नेर गावात घरफोडी

सोन्याची नथ, सोन्याचे डोरले, पाऊणे दोन भारची चांदीची लक्ष्मी, जोडवे, चैन, चांदीचे तुकडे, साखळ्या असा एकूण १ लाख ७६ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केला.घरातले साहित्यही अस्ताव्यस्त केले. सोने -चांदीच्या दागिन्यांची आजच्या बाजार भावानुसार किंमत लक्षात घेतली असता ती सहा लाखांपेक्षा जास्त आहे. पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रविकुमार पवार तपास करीत आहेत.

### मेंढ्या चोरणाऱ्या टोळीचा धुमाकूळ

युवा मोर्चाचे आर. के. माळी यांच्यासह घटनास्थळाची पाहणी केली. आरोपींचा लवकरात लवकर शोध घेऊन कडक कारवाई करण्याचे आश्वासन पोलिसांनी दिले आहे.दरम्यान, गेल्या काही महिन्यांपासून या भागात मेंढ्या चोरीचे सत्र सुरू असल्याने गोरगरीब ठेलारी व आदिवासी समाज त्रस्त झाला आहे. मागील दोन तीन महिन्याच्या कालावधीत चोरांनी तर अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. पोलीस प्रशासनाने तात्काळ या टोळीचा बंदोबस्त करून गुन्हेगारांवर कठोर गुन्हे दाखल करावेत, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालय व पोलीस अधीक्षक कार्यालयावर मेंढ्यांसह भव्य मोर्चा काढण्याचा इशारा स्थानिक ग्रामस्थ व मेंढपाळ बांधवानी पोलीस प्रशासनाला दिलेल्या निवेदनातून दिला आहे. या घटनेचे सविस्तर निवेदन मेंढपाळ व आदिवासी बांधवांनी संयुक्तरित्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तुषार देवरे यांच्याकडे सादर केले आहे. या घटनेकडे पोलीस प्रशासन किती गांभीर्याने पाहते याकडे ग्रामस्थांचे लक्ष आहे.

### वेल्हाणेत आमदार केसरी कुस्त्यांचा थरार



आदी मान्यवर उपस्थित होते. माजी अध्यक्ष भदाणे म्हणाले की, वेल्हाणे सारख्या ग्रामीण भागात एवढ्या भव्य प्रमाणात कुस्ती दंगल भरवणे हे कौतुकास्पद आहे. आमदार राम भदाणे यांच्या वाढदिवसानिमित्ताने झालेला हा क्रीडा महोत्सव युवकांना प्रेरणा देणारा आहे. कुस्तीमुळे शिस्त, चिकाटी आणि आत्मविश्वास वाढतो. अशा स्पर्धांमधूनच राष्ट्रीय स्तरावरील पैलवान घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**पाहिजेत**

१) अनुभवी सेल्समन पाहिजे पगार अनुभवाप्रमाणे देण्यात येईल.
२) लेडिज टॅली अकाऊन्टंट पाहिजे.
-: संपर्क :-
साईबाबा रेडिमेड & होजीअरी
अकबर चौक, गल्ली नं.२, धुळे
9422286958

**पाहिजेत**

दुकान कामासाठी माणूस/मुलगा पाहिजे पार्ट टाईम/फुल टाईम
-: समक्ष भेटा :-
अन्नपूर्णा जलगाववाला
मावा कुल्फी. आग्रा रोड, गांधी चौक, धुळे

**विकणे आहे**



१) देवपूर आग्रारोड, हिम हॉटेलचेमागे, हॉस्पिटल किंवा अपार्टमेंट बनविणेसाठी उपयुक्त असा सिटीएस क्र.४९७५ क्षेत्रफळ ५४७५ चौरस फुटाचा प्लॉट.
२) गोंदुर विमानतळ रोड टच मौजे गोंदुर, गट नं.५५/३बी प्लॉट नं.१ क्षेत्रफळ ६७४० चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
9420602255/9422285483

**पाहिजेत**

१) बेकरी फॅक्टरीमध्ये मेंटेनन्स आणि सुपरव्हिजनसाठी ITI Technician ची गरज आहे.
२) बेकरीच्या मालाच्या वाटपसाठी Salesman माणूस पाहिजे. लिहिता, वाचता आणि हिसोब करता येणे आवश्यक
-: संपर्क :-
लाइफ लाईन बेकरी
मालेगाव रोड, धुळे
7507699616

**सेल्समन पाहिजेत**

चहा पाडवर वाटप साठी सेल्समन पगार–
पार्ट टाईम– १०,०००/–
फुल टाईम– २०,०००/–
वेळ– पार्ट टाईम– स. ६ ते १२ किंवा दु.२ ते ८ रात्री
फुल टाईम– स. ६ ते १२/ दु. २ ते ८ रात्री.
रोशन-टी-चोरडीया, धुळे
प्लॉट नं.११, भगा मोहन नगर, नटराज टॉकी मागे, धुळे,
8208053452




**विकणे आहे**

१५'.५''X६३'
पुर्व-पश्चिम असलेली मोकळी जागा त्वरीत विकणे आहे.
-: ब्रोकर संपर्क :-
7744010511
8888269758

**पाहिजेत**

१) वेटर – ३
२) सिक्युरीटीगार्ड (वाचमन)– १ नाईट (रात्रपाळीसाठी)
हॉटेल न्यू नालंदा
अभय युवा कॉलेज समोर, मुंबई-आग्रा हावे-३,
9637130555
9158630555

**पाहिजेत**

मेडिकल होलसेल दुकानात कामासाठी मुले/मुली पाहिजेत
१) कॉम्प्युटर ऑपरेटर/अकाऊन्टेंट
२) सेल्समन बाहेर गांवसाठी
३) मदतनीस/हेल्पर
संपर्क :- संजय मेडिकल्स्
गल्ली नं.२, धुळे

**विकणे आहे**

वलवाडी गोंदुर रोड दुकान फर्निचर पीओपीसह विकणे आहे. व भोकर शिवारात विमानतळ फाटा सर्व्हे नं.९/१/२ मधील प्लॉट विकणे आहे.
9011894666

**प्लॉट विकणे**

3900 sq.ft.
15 mtr DP road front २ रोड कॉर्नर प्लॉट विकणे. अरुण कुमार वैद्य नगर
-: संपर्क :-
7391055331

**शेती विकणे आहे**

वार शिवारातील गट नं. २६८/४ टकरे तलावाला लागून ४ एकर बागायत शेतजमीन विकणे आहे. शेतावर जाणेसाठी कायमस्वरुपी स्वतंत्र रस्ता आहे.
-:संपर्क :-
विलासराव माळी
8888101111

**पाहिजेत**

कापड दुकानासाठी अनुभवी सेल्समन पाहिजे. आकर्षक पगार
गिरधारी होजअरी
जेन्टस/लेडीज
बाटा शोरूम समोर नगर पालिकाजवळ, धुळे
9420370793
9271280899

**विकणे आहे**

एक हाती वापर, उत्तम कंडीशन XUV 500 कं MH-06-BM-2061 (महिंद्र कं) गाडी विकणे आहे
-: संपर्क :-
9284805199

**पाहिजेत**

रेडिमेड कापड दुकानासाठी
१) सेल्समन– २ जागा
२) हेल्पर– १ जागा
(अनुभव असल्यास प्राधान्य)
त्वरित भेटावे
रॉयल मेन्स वेअर
१३०६-ब, आदर्श पुस्तकाल्याजवळ, आग्रारोड, धुळे.
9423916107






हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०